




दैनिक

# मराठवाडा पत्र

महाराष्ट्राचा बुलंद आवाज

• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १२४ •रविवार, दि. ०३ ऑगस्ट २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955




# 'अर्बन नक्षलसारखे वागाल, तर तुम्हालाही अटक होईल'

## राज ठाकरेंच्या आव्हानाला देवेंद्र फडणवीसांचं प्रत्युत्तर !

**नागपुर । प्रतिनिधी**

शेतकरी कामगार पक्षाच्या (शेकाप) वर्धापन दिन मेळाव्यात बोलताना राज ठाकरे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. जनसुरक्षा कायद्यावरून त्यांनी फडणवीस सरकारला लक्ष्य केलं. आम्हाला अर्बन नक्षल म्हणणाऱ्यांनी आधी स्वतःची पात्रता तपासावी असं ते म्हणाले. तसेच, आम्हाला फक्त अटक करून दाखवा, असं आव्हानही त्यांनी राज्य सरकारला दिल.

दरम्यान, राज ठाकरेंच्या याच आव्हानाला आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. जर तुम्ही अर्बन नक्षतसारखे वागाल तर तुम्हाला अटक केली जाईल, असं त्यांनी म्हटलं. नागपूरमध्ये माध्यमांशी बोलताना त्यांनी राज ठाकरेंच्या टीकेला उत्तर दिलं. हा कायदा त्यांच्यासाठी बनलेला नाही, मग त्यांना अटक का होईल ? जर तुम्ही अर्बन नक्षलसारखे वागात, तरच अटक होईल. तुम्ही तसं वागत नाही, त्यामुळे अटक करण्याची गरज नाही. अशा प्रकारे जे वागतात, त्यांच्यासाठीच तो कायदा आहे. अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

पुढे बोलताना त्यांनी स्पष्ट केलं की, हा कायदा आंदोलकांविरोधात नाही. सरकारविरोधात बोलण्याची सर्वांनाच मुभा आहे. तसेच, राज ठाकरे अशा प्रकारची विधाने करत आहेत, याचा अर्थ त्यांनी तो कायदा अजून वाचलेलाच नाही, असा टोलाही त्यांनी लगावला.

महत्त्वाचं म्हणजे, राज ठाकरे यांनी मराठीच्या मुद्दयावरूनही देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री हिंदीसाठी आग्रही आहे. असं ते म्हणाले होते. यालाही फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिलं.

महाराष्ट्रात मराठी शिकतीच पाहिजे आणि ती अनिवार्य असली पाहिजे. हीच आमची भूमिका आहे. पण मराठी मुलांनी मराठीसोबत आणखी एक भारतीय भाषा शिकली, तर त्यात काय चूक आहे? भारतीय भाषेला विरोध करून इंग्रजीसाठी पायघड्या घालण्याची जी मानसिकता आहे, त्याला मी विरोध करतो. असं फडणवीस म्हणाले.

# अयोध्येतील राम मंदिर उडवून देण्यासाठी बीडच्या तरुणाला मेसेज

## पाकिस्तानातील लोकेशन पण पाठवले



**बीड । प्रतिनिधी**

अयोध्येतील श्रीराम मंदिर उडवून देण्याचा मेसेज बीडच्या एका तरुणाला थेट पाकिस्तानातून आल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकाराने एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणात शिरूर कासार पोलीस ठाण्यात तरुणाने तक्रार दाखल केली आहे. तरुणाने दिलेल्या तक्रारीनुसार, कटात सहभागी होण्यासाठी एक लाखाची ऑफर देण्याच आल्याचेदेखील त्याने म्हटलं आहे. शिवाय संशयिताने कराचीतील लोकेशन देखील पाठविले आहे. या प्रकाराने ▶▶ उर्वरित पान २ वर

# चोरीस गेलेले सोन्याचे दागिने परळी पोलिसांनी शोधून फिर्यादीला केले परत

**परळी । प्रतिनिधी**

शहरातील हलगे गार्डन येथे दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी शिव महाकथेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात महाप्रसादासाठी मोठ्या संख्येने महिलांची गर्दी झाली होती. गर्दीचा फायदा घेत काही महिलांच्या गळ्यातील सोन्याच्या चैन व मंगळसूत्र चोरीस गेल्याच्या घटना घडल्या होत्या. याप्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १७६/२०२४ नोंदवण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक आर. के. नाचण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार ▶▶ उर्वरित पान २ वर



# हॉटेल कामगाराचा संशयास्पद मृत्यू

## मृतदेह ताब्यात घेण्यास कुटुंबाचा नकार, पोलिस अधिक्षकांकडे धाव

**कडा । प्रतिनिधी**



मागील एक महिन्यापासून तालुक्यातील एका हॉटेलवर कामगार म्हणून काम करत असलेल्या कामगारांचा शुक्रवारी सकाळी सहा ते सात वाजण्याच्या दरम्यान मृत्यू झाला होता. मृत्यू संशयास्पद असल्याने कुटुंबासह, नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला असून खुनाचा गुन्हा दाखल करण्यासाठी शनिवारी पोलिस अधिक्षक कार्यालयात ठाण मांडून बसले आहेत. आष्टी तालुक्यातील खडकत येथील एका हॉटेलवर मागील एक महिन्यापासून जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील धेनटाकळी येथील सिताराम रखमाजी ढवळे ( ४० ) हे कामगार म्हणून कामाला होते. शुक्रवारी सकाळी सहा ते सातच्या दरम्यान त्यांचा हॉटेलवरील वरच्या मजल्यावरून पडून मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. मात्र, कुटुंबातील सदस्य व नातेवाईकांनी हा मृत्यू संशयास्पद असून खुनाचा गुन्हा दाखल करावा. तोपयरत मृतदेह ▶▶ उर्वरित पान २ वर

# रशियाकडून खरंच इंधन खरेदी थांबवली? ट्रम्प यांच्या दाव्यानंतर आता केंद्र सरकार फ्रंटफुटवर

**वृत्तसंस्था**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ कार्डने जगभरात धुमाकूळ घातला आहे. त्यांनी ७० हून अधिक देशांना टॅरिफ लागू केला आहे. भारतावर सुद्धा तो लादण्यात आला. तो एका आठवड्यासाठी टाळण्यात आला. ट्रम्प यांनी भारत आणि रशियातील



तेल व्यापारावर आक्षेप घेतला आहे. शस्त्र खरेदी करारावर नाराजी व्यक्त केली आहे. तर भारताने रशियाकडून इंधन खरेदी थांबवली असा दावा त्यांनी केला. त्यानंतर मोदी सरकारने त्यावर थेट प्रतिक्रिया दिली आहे. केंद्र सरकारने ट्रम्प यांच्या वक्तव्यानंतर मोठे वक्तव्य केले आहे. ▶ उर्वरित पान २ वर

# भागवत तावरे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवेक्ते

**• धनंजय मुंडेंकडून मैत्री सिद्ध**

**एकाकी पडलेल्या धनंजय मुंडे साठी गर्दीत उडी मारणारे भागवत तावरे प्रवे होण्यासाठी धनंजय मुंडे यांनी आपले राजकीय कसब वापरत मित्राला पद मिळवून दिले . भागवत तावरे यांनी अनेकदा मित्र म्हणून धनंजय मुंडे यांच्यासाठी परखड भूमिका घेतली याचा त्यांना समाज माध्यमात टीकेला सामोरे जावे लागले . मात्र त्यांनी कधीच धनंजय मुंडे यांची साथ सोडली नाही , मित्राच्या सोबत राहणाऱ्या याच भूमिकेला न्याय देताना धनंजय मुंडे यांनी मराठा समाजातील आपल्या अभ्यासू मित्राला थेट प्रदेश प्रवे I करून जिल्ह्याला सुखद धक्का दिलाय.**

## कुणव्याचं पोरग धनंजय मुंडेंनी मुंबईत नेलं

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश प्रवे पदी नियुक्ती करण्यात आली असून याबाबतचे नियुक्ती पत्र प्रदेश अध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्या स्वाक्षरीने जाहीर करण्यात आले असून बीड मधील सामान्य कुटुंबातील युवकाला मुख्य सदरेवर संधी दिल्याची चर्चा आहे. बीड मधील विविध दैनिकातून लोकप्रिय लिखाण करणारे तावरे यांना सदरील संधी धनंजय मुंडे यांनी मिळवून दिल्याने कुणब्याच पोरग डीएम ने मुंबईत नेल्याची लोकभावना आहे . राज्यभर असणारे पाठीराखे, हिंदी, उर्दूवर पकड असलेला मराठा चेहरा, वाचन, लिखाण, ऐतिहासिक संदर्भ आणि राजकीय परिघाचा असलेला अभ्यास पाहता राष्ट्रवादीला एक प्रभावी चेहरा फर्डा वक्ता आणि कडवट पुरोगामी संवादक लाभला असल्याचे बोलले जात आहे . बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र राष्ट्रवादी पक्षाचे राज्य प्रवक्ते ▶▶ उर्वरित पान २ वर



# कर्तव्यदक्ष अधिकारी अनिल अहिरे यांची नायब तहसीलदार पदी पदोन्नती

## पत्नीच्या पाठबळामुळे यशाचा टप्पा गाठला: अहिरे

**धाराशिव । प्रतिनिधी**

कर्तव्यदक्ष व लोकाभिमुख सेवेसाठी प्रसिद्ध असलेले अनिल अहिरे यांची नुकतीच नायब तहसीलदार पदावर पदोन्नती करण्यात आली आहे. महसुल प्रशासनात कार्यरत असताना त्यांनी कळंब, जागजी, नायगाव व गोविंदपूर या महसूल मंडळांमध्ये अत्यंत जबाबदारीने व निष्ठेने काम केले. त्यांच्या या यशामागे पत्नी सुजाता अनिल अहिरे यांचे मोलाचे सहकार्य ▶▶ उर्वरित पान २ वर



# सीआयएसएफ जवानाची मुंबईत आत्महत्या

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा जवळील रामनगर येथील रहिवाशी असलेले सीआयएसएफ जवान अशोक गर्जे यांनी मुंबईतील मुख्यालय बिल्डींगमधील खोलीत दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची ▶▶ उर्वरित पान २








# लाडकी बहीण योजनेसंदर्भात फेक लिंकपासून सावधान, व्हायरल बातम्यांवर विश्वास ठेऊ नका

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य सरकारची महत्त्वाकांक्षी योजना असलेल्या लाडकी बहीण योजनेसंदर्भात मोठी अपडेट समोर येत आहे. या योजनेच्या नावे काही फेक साईट, फेक लिंक व्हायरल होत आहेत. त्या माध्यमातून डेटाही चोरी होण्याची शक्यता आहे. तसेच अपात्र महिलांची नावे कशी तपासायची या संदर्भातही काही बातम्या व्हायरल होत आहेत. पण तशी कोणतीही सुविधा लाडकी बहीण योजनेच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांनी वा ज्यांच्या खात्यात जून महिन्याचे पैसे आले नाहीत त्यांनी चुकीच्या माहितीला बळी पडू नये.




लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून दर महिन्याला राज्य सरकारच्या वतीने लाभार्थी महिलांच्या नावे १५०० रुपये दिले जातात. पण या योजनेचा गैरफायदा काही पुरुषांनी आणि श्रीमंत महिलांनीही घेतल्याचं निदर्शनास आलं. त्याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारने छाननी करुन नुकतंच २६.३४ लाख महिला अपात्र ▶▶ उर्वरित पान २ वर

# फ्रेंडशिप डे: जाणून घ्या त्याचे खास महत्त्व आणि इतिहास

जगामध्ये अनेक नाती जन्माने मिळतात, पण मैत्रीचे नाते हे असे नाते आहे जे आपण स्वतः निवडतो. हे नाते विश्वास, प्रेम आणि निस्वार्थ समर्थनाचे प्रतीक आहे. प्रत्येक वर्षी ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी साजरा होणारा 'फ्रेंडशिप डे' (मैत्री दिवस) याच अमूल्य नात्याचा गौरव करतो. २०२५ मध्ये हा दिवस ३ ऑगस्ट रोजी साजरा होणार आहे. हा दिवस आपल्याला आपल्या मित्रांचे आभार मानण्याची, जुन्या आठवणींना उजाळा देण्याची आणि नवीन आठवणी तयार करण्याची अनोखी संधी देतो. पण हा दिवस साजरा करण्याची गरज का निर्माण झाली, याचा इतिहास आणि महत्त्व काय आहे, आणि आयुष्यात एका चांगल्या मित्राची खरी गरज का असते, हे सविस्तर जाणून घेऊया.




### ● आयुष्यात चांगल्या मित्राची गरज का?

प्रत्येक क्षणी साथ: जीवनात असे अनेक क्षण येतात जेव्हा सर्व काही आपल्या मनासारखे नसते. अशा कठीण परिस्थितीत, अनेकदा कुटुंबाकडूनही अपेक्षित साथ मिळत नाही. अशा वेळी, एक चांगला मित्रच तुमच्या भावना ऐकून घेतो, तुम्हाला धीर देतो आणि तुम्हाला सावरतो. जीवनातील ताणतणावाच्या क्षणांमध्ये मित्रांची साथ असेल, तर तणाव आपोआप कमी होतो.

### ● सुख-दुःख वाटून घेणारा:

जेव्हा आयुष्यात काहीतरी चांगले घडते, तेव्हा सर्वात आधी आपण आपल्या मित्रांनाच सांगतो. मित्र आपल्या आनंदात स्वतःच्या आनंदाप्रमाणे सहभागी होतात. त्यांच्यासोबत घालवलेला प्रत्येक क्षण आपल्या आठवणींचा अविस्मरणीय भाग बनतो. याशिवाय, एक खरा मित्र नेहमीच तुम्हाला प्रेरणा देतो. तुमची स्वप्ने कितीही मोठी असोत किंवा छोटी, तो ती पूर्ण करण्यासाठी तुम्हाला मदत करतो.

### ● विश्वास वाढवणारा आधार:

एक चांगला मित्र प्रत्येक अडचणीत तुमच्या पाठीशी उभा राहतो आणि तुम्हाला कधीही हार मानू देत नाही. मैत्रीचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे विश्वास. आपल्या मित्रांसोबत तुम्ही कोणतीही भीती न बाळगता प्रत्येक गोष्ट शेअर करू शकता. त्यांची उपस्थिती तुम्हाला हे पटवून देते की तुम्ही कोणतीही परिस्थिती हाताळू शकता.

### ● फ्रेंडशिप डेचा इतिहास:

फ्रेंडशिप डेची संकल्पना सर्वात आधी १९३० मध्ये अमेरिकेत उदयास आली. 'हॉलमार्क' या ग्रीटिंग कार्ड्स बनवणाऱ्या कंपनीने या दिवसाची व्यावसायिक सुरुवात केली, जेणेकरून लोक आपल्या मित्रांना कार्ड्स पाठवून आपल्या भावना व्यक्त करू शकतील. हळूहळू हा दिवस लोकांच्या मनात घर करू लागला. १९४८ मध्ये, पराग्वेमध्ये (झरीरर्सीरू) पहिल्यांदा फ्रेंडशिप डे साजरा करण्याचा औपचारिक प्रस्ताव मांडण्यात आला. यानंतर ही परंपरा अनेक देशांमध्ये पसरली आणि जगभरात मैत्रीचा उत्सव म्हणून साजरा होऊ लागली.

### ● फ्रेंडशिप डेचे महत्त्व:

फ्रेंडशिप डे आपल्याला आपल्या मित्रांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याची आणि त्यांच्यासोबत घालवलेल्या क्षणांना जपण्याची संधी देतो. हा दिवस केवळ वैयक्तिक संबंध मजबूत करत नाही, तर सामाजिक एकता, सम ावेशकता आणि सांस्कृतिक विविधतेलाही (प्रोत्साहन देतो. मानसशास्त्रीय दृष्ट्या, मैत्रीमुळे ताण, एकटेपणा आणि चिंता कमी होते. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की मित्र हे असे कुटुंब आहेत, ज्यांना आपण स्वतः निवडतो.

## मैत्री



मैत्री, ही एक अशी भावना आहे जी दोन किंवा अधिक व्यक्तींमध्ये प्रेम, विश्वास आणि आपुलकी निर्माण करते. जीवनात मैत्रीचे खूप महत्व आहे. मैत्रीमुळे आपल्याला चांगले-वाईट काळात एकमेकांना साथ मि ळतो, अडचणींवर मात करण्यासाठी आधार मिळतो आणि आनंदी राहण्यास मदत होते.

● मैत्रीचे महत्व:

- आधार: मैत्रीण आपल्याला नेहमी अडचणीच्या काळात साथ देतात.
- सुख-दुःख: मित्र-मैत्रीण सुख-दुःखात सोबत असतात.
- विश्वासाचे नाते: मैत्रीमध्ये विश्वास आणि प्रामाणिकपणा असतो.
- मनोरंजन: मित्र-मैत्रिणींसोबत वेळ घालवणे मजेदार आणि उत्साही असते.
- शिकणे: मित्र-मैत्रिणींकडून आपण अनेक गोष्टी शिकतो.
- चांगले आरोग्य: मैत्रीपूर्ण नातेसंबंधांमुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्य चांगले राहते.

● खरा मित्र कसा ओळखावा?

- प्रामाणिकपणा: खरा मित्र नेहमी प्रामाणिक असतो.
- विश्वास: तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवू शकता.
- समजून घेणे: तो तुमच्या भावनांची आणि विचारांची कदर करतो.
- आधार: तो नेहमी तुमच्या पाठीशी उभा असतो.

● निष्कर्ष: मैत्री हे एक अनमोल नाते आहे. ते आपल्याला जीवनात खूप आनंद आणि समाधान देते.

– संकलन
शबनम मुजीब खान
छ. संभाजीनगर (औरंगाबाद)

◆ पान ९ वरून पुढे...

## अयोध्येतील राम...

तक्रारदार तरुण हादरला. त्याने लगेचच पोलीस स्टेशन गाठत तक्रार दाखल केली आहे. एक तरुण सोशल मीडियाचा वापरकर्ता आहे. सोशल मीडिया वापरत असताना त्याला एक मेसेज आला. या मेसेजमध्ये अयोध्येतील श्रीराम मंदिर आरडीएक्सने उडवून देण्याची धमकी दिली. आपण पाकिस्तानी आहोत हे पटवून देण्यासाठी संशयिताने कराचीतील लोकेशनही तरुणाला पाठवले. शिवाय कटात सहभागी होण्यासाठी एक लाख रुपयांची ऑफर दिली. या कामासाठी ५० जण हवे असून त्यांना प्रत्येकी एक लाख देऊ तर मंदिर उडवण्यासाठी आरडीएक्स पुरवू असे संशयिताने मेसेज द्वारे सांगितले. बीडच्या तरुणांला धमकीचा मेल आल्यामुळं एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, अयोध्येतील राम मंदिराला धमकी देण्यात आल्याची ही पहिलीच वेळ नाही. या आधीही सप्टेंबर २०२४मध्ये एका तरुणाने सोशल मीडियावर धमकी दिली होती. त्यानंतर या तरुणाला बिहारच्या भागलपूर अटक करण्यात आली होती. त्याचबरोबर, राम मंदिरात रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा होण्याआधी अनेकदा धमक्या देण्यात आल्या. यानंतर एप्रिल २०२५ मध्ये अयोध्येतील राम मंदिर बॉम्बने उडवून देण्याच्या धमकीचा ई मेल अयोध्या राम मंदिर ट्रस्ट आणि उत्तर प्रदेशातील अनेक जिल्ह्यांच्या डीएमना आला होता. हा ई मेल तामिळनाडूतून आल्याची माहिती समोर आली होती. तर 'मंदिराची सुरक्षा वाढवा' असं देखील धमकीच्या मेसेजमध्ये नमूद करण्यात आले होते.

## चोरीस गेलेले...

गोविंद भताने, घटमळ व पो. ना. पांचाळ यांनी केला. तपासादरम्यान आरोपी महिला बीड व धाराशिव येथे शोध घेऊन त्यांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून चोरीस गेलेली चैन व मंगळसूत्र हस्तगत करण्यात आले. आज रोजी फिर्यादी कमलाबाई मोतीलाल बांगड यांचा मुलगा मनोजकुमार मोतीलाल बांगड यांना एक सोन्याची चैन (कीमत अंदाजे ₹२,५०,०००) परत करण्यात आली. सदर चैन सुमारे २५ ग्रॅम वजनाची आहे. सोन्याचे दागिने परत मिळाल्यामुळे फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांनी परळी पोलिसांचे आभार मानत समाधान व्यक्त केले आहे. ही कारवाई परळी पोलिसांनी तात्काळ व प्रभावीपणे पार पाडल्याने नागरिकांतून पोलीस दलाचे कौतुक होत आहे.

## हॉटेल कामगाराचा...

ताब्यात घेणार नसल्याची भूमिका घेतल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. कुटुंबातील सदस्य व नातेवाईक बीड येथे पोलिस अधीक्षकांकडे गेले असून खुनाचा गुन्हा दाखल करण्यात यावा म्हणून ठाण मांडून बसले आहेत.घटनास्थळी आष्टीचे पोलीस निरीक्षक शरद भुतेकर, पोलिस हवालदार प्रवीण क्षीरसागर, हनुमान घाडगे, भरत गुजर, बिभीषण गुजर, चालक भाग्यवंत यांनी भेट देऊन पंचनामा केला आहे. आष्टी पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून मृतदेहावर आष्टी ग्रामीण रूगणालयात शवविच्छेदन करण्यात आले असून मृतदेह ताब्यात न घेतल्याने आष्टी येथील शवगृहात ठेवण्यात आले आहे.

## रशियाकडून खरंच....

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले की, भारत

◆ पान ९ वरून पुढे...

आता रशियाकडून तेल खरेदी करणार नाही. मी असंच ऐकलं आहे, हे खरं की खोटं याची मला माहिती नाही. पण हे एक चांगलं पाऊल आहे. आम्ही समोर काय होते, याकडे लक्ष ठेऊन आहोत. ट्रम्प यांच्या दाव्यानंतर एकच खळबळ उडाली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या या दाव्यानंतर सरकारकडून प्रतिक्रियेची अपेक्षा व्यक्त होत होती. खरंच भारताने रशियाकडून इंधन खरेदी थांबवली आहे का? तशी काही योजना आहे का? असे प्रश्न विचारण्यात येत होते. दरम्यान सरकारी तेल खरेदी करणाऱ्या कंपन्यांनी त्यावर प्रतिक्रिया दिली आहे. रशियाकडून तेल खरेदी न करण्यासंदर्भात कोणताही शासकीय आदेश आले नसल्याची प्रतिक्रिया कंपन्यांनी दिली. त्यामुळे अमेरिकेच्या दबावाखाली भारत रशियाकडून तेल खरेदी करणे थांबवणार नाही, असे तरी सध्या समोर येत आहे. भारत तेल खरेदी करणार नाही, अशा अफवांनी ट्रम्प हे खूश असल्याचे आता तरी समोर येत आहे. तर एक दिवसापूर्वी भारत आणि रशियात काय संबंध आहेत, याने आपल्याला काही फरक पडत नसल्याचे ते म्हटले होते. ट्रम्प मित्रच का? डोनाल्ड ट्रम्प हे भारताचे चांगले मित्र असल्याचा दावा करत आहेत. तर दुसरीकडे त्यांनी भारतावर टॅरिफ बॉम्ब टाकला आहे. लक्षात ठेवा, भारत हा आपला मित्र आहे, पण गेल्या काही वर्षांत आपण त्याच्यासोबतचा व्यापार कमी केला आहे. कारण या देशाचे टॅरिफ जास्त आहे. त्यांच्या लष्करी साहित्याची खरेदी त्यांनी रशियाकडूनच जास्त केली आहे. त्यामुळे भारताला ऑगस्त महिन्यात २५ टक्के टॅरिफ आणि दंड द्यावा लागेल.भारतीय तेल कंपन्या इराण किंवा व्हेनेझुएला कडून खनिज तेल खरेदी करत नाही. कारण या देशांवर अमेरिका कडून घातलेले निर्बंध आहेत. भारतीय तेल कंपन्या सातत्याने अमेरिका कडून सुचवलेल्या म ार्गदर्शक तत्वांचं पालन करत आहेत. विशेषतः रशियन खनिज तेलाच्या बाबतीत, त्यांनी अमेरिकेने ठरवलेल्या ६० डॉलर प्रती बॅरल या किंमत मर्यादेचं या कंपन्यांनी पालन केलं आहे. तर अलीकडेच युरोपियन संघाने (एण) रशियन कच्च्या तेलासाठी ४७.६ डॉलर प्रती बॅरल ही नवीन किंमत मर्यादा सुचवली आहे. ही किंमत मर्यादा सप्टेंबर महिन्यापासून लागू होणार आहे.

## भागवत तावरे....

झाले असून या पुढे ते पक्ष व पक्षांच्या नेत्यांची भूमिका मांडतील . सामाजिक सलोखा , रुग्ण सेवा , आपत्ती काळातील मदत मोहिमा , सामान्य लोकात मिसळून राहणे व महाराष्ट्राच्या वैचारिक संपन्न वर्तुळात काम करणारे तावरे यांना पक्षाने दिलेला हा सन्मान पक्षाच्या उदार धोरणाचे प्रतीक ठरले . शेतकरी व सामान्य ग्रामीण कुटुंबातून आलेले व कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेले भागवत तावरे यांना अजित दादांच्या पक्षाने दिलेला न्याय महाराष्ट्रात व राजकीय वर्तुळात कौतुकाचा विषय ठरला आहे . या निवडीबद्दल नवनियु प्रदेश प्रवक्ता भागवत तावरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, राष्ट्रीय नेते खा. प्रफुल पटेल, ज्येष्ठ नेते, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, राष्ट्रीय प्रवे श्री. आनंद परांजपे, माजी आ. अमरसिंह पंडित यांसह पक्षातील मान्यवर नेत्यांचे आभार मानले आहेत. भागवत तावरे हे रविवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे स्फूर्तिस्थान असलेल्या कराड येथील प्रीती संगमावर स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या समृतिस नतमस्तक होऊन आपल्या कार्याची सुरुवात करणार आहेत. गाजणार

◆ पान ९ वरून पुढे...

आता डिबेट-भागवत तावरे म्हणजे अभ्यास , राजकीय संदर्भ , सामान्य लोकातला आवाजआणि महत्वाचे त्यांचं मांजर नेहमी चार पायावर पडते . सोशल मीडियात एकटा उडी मारत भूमिका पुढे नेणारा फर्डा वक्ता. सर्व धर्मात आणि जातीतील कुठलाही कार्यक्रम सभा उपक्रम असो , उर्दूचा बाज चढवून हिंदीत भाषण करणारा अगदी बयान वाटावे , त्याच प्रमाणे गळ्यात तुळशीची माळ असलेला ज्ञानेश्वरीवर प्रवचन देणारा प्रवक्ता फुले शाहू आंबेडकर विचारांचा पाईक असलेले भागवत तावरे पक्षाची भूमिका घेऊन जेव्हा बसतील तेव्हा एक सकारात्मक संवादक ऐकायला पहायला मिळेल . भागवत तावरेने ठरवले कि व्यक्ती संस्था पक्ष लोकांच्या मनात बसलाच असे सूत्र आहे . उदात्तीकरण करताना वास्तव मुद्दे घेऊन निरागस व्यक्त्वि सादर करताना लोकभाषेत लोकभावनेत भूमिका ठसवणे यात ते माहीर असल्याने पक्षाच्या अनेक नेत्यांना यांचा लाभ होईल .डी. एम. सह्याद्रीवर मंत्रिपदासाठी नाही तर तावरेसाठी दोन दिवसापूर्वी धनंजय मुंडे सह्याद्रीवर पोहचले आणि ते मंत्री पदासाठी लॉबिंग करत असल्याच्या माध्यमांनी बातम्या चालवल्या, मात्र यावेळी धनंजय मुंडे व भागवत तावरे यांचा सह्याद्रीवर प्रवेश झाला आणि अगदी काही मिनिटात धनंजय मुंडे अजित पवार व सुनील तटकरे यांच्याशी चर्चा करून परतले . भागवत तावरे मात्र सह्याद्रीवर थांबले . भागवत तावरेंची निवड संदर्भात सदरील भेट असल्याचे निश्चित झाले असून मंत्री पदासाठी लॉबिंग न करता एका सामान्य युवकाला संधी मिळवून देण्यासाठी ते सह्याद्रीवर गेल्याचे स्पष्ट झाले.

## कर्तव्यदक्ष अधिकारी...

असून त्यांनी प्रत्येक टप्प्यावर मानसिक व सामाजिक पाठबळ दिले.

अनिल अहिरे यांना यापूर्वी त्यांच्या कर्तव्यनिष्ठ सेवेसाठी चार वेळा कर्तव्यदक्ष मंडळ अधिकारी म्हणून गौरविण्यात आले आहे. कामाच्या ठिकाणी त्यांनी पारदर्शक प्रशासन, जनतेशी संवाद आणि त्वरित सेवा या मूल्यांचा अवलंब केला. त्यामुळेच सहकाऱ्यांमध्ये व स्थानिक नागरिकांम ध्ये त्यांच्याविषयी आदराचे व विश्वासाचे वातावरण आहे. त्यांच्या या यशाबद्दल जीवन शिक्षण विद्यालय केज व त्यांचे मेव्हणे सहशिक्षक धम्म पाल गायकवाड व परिवार तसेच विविध शासकीय अधिकारी, स्थानिक नेते व ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले असून, पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्या पदोन्नतीने धाराशिव महसूल विभागात एक सकारात्मक ऊर्जा संचारली आहे.

## लाडकी बहीण...

ठरवल्या आहेत. जून महिन्यामध्ये त्यांच्या खात्यावर पैसे हस्तांतरित करण्यात आले नाहीत. फेक लिंक व्हायरल- या पार्श्वभूमीवर लाडकी बहीण योजनेसंबंधी काही फेक साईट व्हायरल होत आहेत. तसेच आपण पात्र आहोत की अपात्र आहोत हे तपासण्यासाठी काही फेक लिंकही व्हायरल केल्या जात आहेत. त्यासाठी आधार कार्डचा वापर करावा असं सांगत आधार नंबर घेतला जात असल्याचं निदर्शनास आलं आहे. त्या माध्यमातून मोठा डेटाही चोरीला जाण्याची शक्यता आहे. अपात्र लाभार्थ्यांची यादी तपासता येत नाही- सरकारने जरी काही महिलांना अपात्र केलं असलं तरी वेबसाईटवर अपात्र महिलांची यादी तपासण्यासाठी कोणतीही सुविधा उपलब्ध नाही. जर एखादी महिला या योजनेसाठी पात्र असेल तर तिला तिच्याशी संबंधी सर्व वैयक्तिक माहिती मिळू शकते. ि

◆ पान ४ वरून पुढे...

## ई पीक पाहणी...

सवलती मिळवायच्या असतील – तर ही नोंदणी अत्यावश्यक असते . याशिवाय, याच माहितीच्या आधारे शासन पीक खरेदीचं नियोजन करतं आणि शेतकऱ्यांना योग्य दर मिळवून देण्यासाठी उपयोग करते. यानिमित्ताने बोलताना बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी बीड गेवराई व शिरूर कासार तालुक्यातील शेतकऱ्यांनी तात्काळ ई पीक पाहणीस सुरुवात करून नोंदणी करावी असे आवाहन केले आहे. या डिजिटल प्रक्रियेमुळे शेतजमिनीचा रेकॉर्डही अद्ययावत राहतो , वाद , गैरसमज टाळता येतात आणि शेतीत पारदर्शकता निर्माण होते. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी कळविले आहे की मागील वर्षी शेतकऱ्यांनी जसा प्रतिसाद दिला होता त्याप्रमाणे यावर्षी सुद्धा ईपीक पाहणे करून घ्यावी . जर नोंदणी करताना अडचण येत असेल , तर ग्रामपंचायत कार्यालय , कृषी सहाय्यक किंवा ग्राम महसूल अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा . ते मार्गदर्शनासाठी नेहमीच तयार असतात . शेतकऱ्यांनो , ही नोंदणी तुमचं पीक सुरक्षित करण्यासाठी, तुमचा आर्थिक हक्क मिळवण्यासाठी आणि तुमचं भवितव्य उजळवण्यासाठी आहे . ई पीक पाहणी म्हणजे फक्त एक औपचारिकता नाही , तर ती आहे तुमच्या हक्काची नोंद !

## माजलगाव सह...

महिलांचे विशेष कौतुक करण्यात आले. या खास दिनाचे औचित्य साधून कार्यालयाची फुलांनी व फुग्यांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती. रंगीबेरंगी रांगोळीने परिसर अधिकच सुंदर व स्वागतार्ह वाटत होता. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये प्रभारी सह दुय्यम निबंधक गणेश चौधरी, कनिष्ठ लिपिक विनोद मुनेश्वर, संगणक ऑपरेटर नामदेव लटपटे व सिद्धेश्वर बोबडे यांचा मोलाचा सहभाग होता.महसूल विभागाचा हा उपक्रम लोकाभिमुख प्रशासनाची जाणीव करून देणारा ठरला असून नागरिकांमध्ये सकारात्मक प्रतिसाद पाहायला मिळाला.

◆ पान ४ वरून पुढे...

## दादा येणार...

यांच्या मार्गदर्शनाखाली साफसफाई चालू आहे परंतु मुकादम, सुपरवायझरच नाहीतर स्वच्छता निरीक्षक सुद्धा ऐकायला तयार नाही. दुर्गंधीमुळे नागरिकाचे आरोग्य धोक्यात येत आहे. काही जागेवर तर श्वास घेणे सुद्धा मुश्किल झाले आहे तरी माझी माननीय पालकमंत्री यांना विनंती आहे की, त्यांनी बीड नगरपरिषद तसेच जिल्ह्यातील प्रत्येक नगरपरिषद यांची बैठक घेऊन' स्वच्छ जिल्हा ' सुंदर जिल्हा ' ठेवण्याचे आदेश द्यावे.

## अण्णाभाऊ साठे...

अण्णाभाऊनी आपले आयुष्य वंचित पीडित शोषित व्यक्तींना न्याय मिळावा म्हणून समाजासाठी संघर्ष करत संपूर्ण जीवन निस्वार्थ भावनेने समर्पित केले , त्यांनी परदेशात देखील आपल्या साहित्यातून कार्य केले व एवढेच नाही तर रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य किती महान होते हे आपल्या पोवाडा शाहिरीतून मांडले. गेल्या वर्षीच देवेंद्रजी फडणवीस यांनी रशियामध्ये त्यांच्या पुतळ्याचे अनावरण केले .त्यांचे कार्य हे देशातच नव्हे तर परदेशात विशेष म्हणजे रशियात देखील मांडले जाते रशियांच्या लोकांना अण्णाभाऊ साठे यांचे कार्य लवकर कळाले पण आपल्या लोकांना आजही अण्णाभाऊ साठेंचे कार्य हे कळाले नाही त्यामुळे यापुढील काळात त्यांचे कार्य कळावे म्हणून त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांनी केलेले विविध कार्य हे व्याख्याने व निबंध वक्तृत्व स्पर्धा ठेवून त्यांचे विविध कथा कादंबरी पुस्तकाचे समाजामध्ये वाटप करून त्यांचे कार्य सर्वांपर्यंत पोहोचन्यासाठी आपण सर्वांनीच प्रयत्न केले पाहिजेत व आपण अशाप्रकारे जयंतीच्या माध्यमातून उपक्रम घेतले तर त्यांची जयंती खऱ्या अर्थाने साजरी केली असे म्हणायला उचीत ठरेल. गेल्या अनेक वर्षापासून लहुजी विद्रोही सेनेचे संस्थापक अध्यक्ष भास्कर शिंदे हे अण्णाभाऊ साठे यांची जयंती विविध उपक्रम घेऊन जयंती साजरी करतात त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून कौतुक केले. या कार्यक्रमाचे प्रसंगी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते

◆ पान ४ वरून पुढे...

अच्युतराव लाटे शरद यादव अजय शिंदे , अजयसिंह राऊत या उपस्थित मान्यवरांनी देखील अण्णाभाऊ साठे यांचे कार्य मांडले. या कार्यक्रमास मा उपनगराध्यक्ष दिपक मेंडके राम राजे सोळंके अजय सिंह राऊत दिनकर शिंदे शरद कचरे आनंद कुलकर्णी संतोष जाधव नामदेव मुळे मनोज फरके सह विविध पक्षातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## बीडच्या बाजार...

२०२५ रोजी २४ हजार ४ किलोग्राम (२४ टन) रेशीमची आवक झालेली असून ही खरेदी १ कोटी ३३ लक्ष रुपयांची ठरली आहे तर काल दिनांक २ ऑगस्ट २०२५ रोजी तब्बल १७ हजार ०५२ किलो (१७ टन) आवक झालेली असल्याची माहिती कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक धनंजय गुंदेकर यांनी आहे. रेशीम कोष खरेदी केंद्राबद्दल गेल्या काही वर्षांपासून नवीन संचालक मंडळ विशेष लक्ष देऊन आहे. सर्व संचालक मंडळ, सभापती मुळे, उपसभापती पडुळे व रेशीम कोष खरेदी केंद्रातील सर्व कर्मचारी यांच्या मेहनतीमुळे हे शक्य होऊ शकले आहे. खरेदी केंद्राने शेतकऱ्यांचा विश्वास जिंकल्याने राज्यभरातून शेतकऱ्यांची रेशीम कोश विक्रीसाठी बीडला पसंती मिळत आहे. अनेक सुविधा शेतकऱ्यांसाठी रेशीम कोश खरेदी केंद्रात सुरू करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये शेड उभारणीसह ७ दिवसांत शेतकऱ्यांना पेमेंट उपलब्ध करून देण्यासारख्या सुविधा निर्माण करण्यात आल्याची माहिती संचालक धनंजय गुंदेकर यांनी दिली आहे.

## जगण्यासाठी लढाई...

आणि मृतदेह तहसील कार्यालयासमोर आणावा लागला. अत्यंत बिकट परिस्थिती असलेल्या २० गावांची स्थिती भयावह- स्मशानभूम ीसाठी जागाच नसलेल्या गावांमध्ये हे संकट अधिक गडद आहे. यात अंबेजोगाई तालुक्यातील धावडी, उमराई, दैठणा, कोपरा, वडवणीतील दुकडेगाव, पुसरा, आष्टीतील वटणवाडी, धारूरमधील धनुकवाड,

◆ पान ४ वरून पुढे...

गेवराईतील नवीन नागझरी व केज तालुक्यातील सोने सांगवी (सुर्डी) या गावांचा समावेश होतो. ज्या गावांमध्ये ग्रामपंचायतच्या मालकीची जम ीन उपलब्ध नाही, तिथे गायरान जमीन आरक्षित करून स्मशानभूमीची व्यवस्था करण्यात यावी. तसेच स्मशानभूमीवर असलेल्या अतिक्रमणांवर तातडीने कारवाई करण्यात यावी. हा विषय फक्त विकासाचा नाही, तर माणुसकीचा आहे. पालकमंत्री अजितदादा पवार यांनी जिल्हा नियोजनातून निधी उपलब्ध करून हा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी ठाम मागणी मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य चे डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केली आहे. शेवटी... मरणासमयीही जर इज्जतीने अंत्यसंस्कार होणार नाहीत, तर अशा समाजव्यवस्थेची चाचणीच फसलेली आहे. मृतदेह शासकीय दारात ठेवण्याची वेळ सामान्य जनतेवर येते, याची दखल प्रशासन आणि सरकारने घेणे आवश्यक आहे.

## मराठ्यांनी २९...

रांगोळी करून आपल्यासाठी मनोज दादा जरांगे पाटील आपल्याला आव्हान करत आहेत तर आपली ही जबाबदारी आहे सात करोड म राठ्यांनी एकदिवस येत्या २९ ऑगस्टला मुंबईच्या दिशेने रवाना व्हायच आहे आणि मनोज दादाच्या माध्यमातून ८० टक्के मराठा समाज हा कुणबी म्हणून ओबीसी मध्ये सामील झाला आहे आणि राहिलेला वीस टक्के सम ाज देखील कुणबी म्हणून ओबीसी मध्ये सामील झाल्याशिवाय राहणार नाही त्यामुळे आपण तर यायचंच आहे परंतु आपल्याबरोबर आपले मित्र, आपले नातेवाईक आणि आपल्या गावामध्ये अनेक वंचित बांधवांना देखील येण्यासाठी आव्हान करायच आहे कारण मनोज दादा पाटील हे सर्वांच्या हक्कासाठी लढा देत आहेत त्यामुळे सर्व जातीधर्माच्या लोकांनी यामध्ये सामील होऊन ऐतिहासिक दिवसाचे साक्षीदार होणे गरजेचे आहे असे आवाहन मराठा बांधव किरण डावकर यांनी सर्व महाराष्ट्रातील मराठा बांधवांना केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# विद्यार्थ्यांनी पुस्तकांच्या मैत्रीतून वाचन संस्कृती जोपासून स्पर्धेत यश मिळवावे : पी.व्ही. बनसोडे

## बीड शहरातील तिसरा मोफत शिकवणी वर्ग, महामानव अभिवादन ग्रुपने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंतीदिनी सुरू

**बीड । प्रतिनिधी**

जग बदल घालुनी घाव... सांगून गेले मज भीमराव हया नुसार आपल्या संपूर्ण जीवनाची वाटचाल करणाऱ्या लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०५ व्या जयंती दिनी महामानव अभिवादन ग्रुपने सुरू केलेल्या तिसऱ्या मोफत शिकवणी वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतीमेस विनम्र अभिवादन करून कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षपदी लाभलेले माजी सीईओ जिप पी. व्ही.बनसोडे यांनी जय भीम बुद्ध विहार पूरग्रस्त कॉलनी येथे विद्यार्थी व पालकांशी संबोधितांना उद्गार काढले की शिस्त, बालपणीच्या चांगल्या सवयी व पुस्तकाच्या मैत्रीतून वाचन संस्कृती जोपासून स्पर्धेत यश मिळवता येते. कार्यक्रमास महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम.भोले यांनी करून प्रास्ताविकात ग्रुपची व पुढील नियोजनाबद्दल सविस्तर माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.एम.राऊत यांनी केले. कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा.डॉ.उत्तमराव साळवे, सेवानिवृत्त उपनिबंधक हनुमंत कांबळे,प्रा.बी.व्ही. काळे,प्रा. श्रीराम जाधव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विचार मंचावर



प्राचार्य सुशीलकुमार गायकवाड, वाचाल तर वाचाल वाचनालयाचे अध्यक्ष डी.जी.वानखेडे, समता सैनिक दलाचे मेजर जनरल कॅप्टन राजाभाऊ आठवले व सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक एलआयसी यु.एस. वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम महामानवांच्या प्रतीमेस पुष्प व पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मोफत शिकवणी वर्गाचे रवींद्र टेकाळे यांना शिकवणी वर्गाकरिता विद्यार्थ्यांना लागणारे शालेय साहित्य ९६ वह्या व १०० पेन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महामानव अभिवादन ग्रुपच्या वतीने देण्यात आले. मुलांची वाचन संस्कृती वाढवण्याकरिता वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाचे डी.जी वानखेडे यांनी ५१ पुस्तकांचा संच ३९ व्या केंद्र असलेल्या, मान्यवरांच्या हस्ते प्रकाश जावळे यांना सुपूर्द केला. या पुस्तकांचे वाचन करून महामानवाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा ही अपेक्षा व्यक्त केली.

प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.उत्तमराव साळवे यांनी विद्यार्थ्यांना अत्यंत सोप्या भाषेत शिक्षणाचे महत्त्व व पालकांनी घ्यावयाची काळजी अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितली.प्रा. श्रीराम जाधव, बी.व्ही.काळे, प्रशांत वासनीक यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अनमोल विचार समजावून सांगितले.मोफत शिकवणी वर्गाकरिता दानदाते प्रा.डॉ. नामदेव शिनगारे, प्राचार्य सुशीलकुमार गायकवाड प्रा.श्रीराम जाधव, प्रा. बी व्ही काळे व हनुमंत कांबळे यांनी भरघोस अर्थसहाय्य केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अँड. तेजस वडमारे यांनी केले कार्यक्रमास, प्रा.अशोक गायकवाड, ए.एल.अवसरमोल, काशिनाथ वाघमारे, इंजि. वसंतराव तरकसे, आर.डी.चक्रे, बी.जी दळवी, एस.एस.सोनवणे, माया ससाने, दादाहरी गायकवाड, असंख्य महिला व उपासक-उपासिकांची उपस्थिती होती. योगेश शिंदे, बप्पा जावळे, प्रकाश जावळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता बहुमोल परिश्रम घेतले. सरनातयणे व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.

## मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक त्यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

पेठ बीड भागातील मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयात लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाल गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी दि.१ऑगस्ट २०२५ शुक्रवारी उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला लोकशाहिर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेला कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक सोहनी सर, प्रमुख वक्ते तंबरे सर, मंत्री सर, सुराणा मॅडम, घोडके मॅडम यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



यावेळी ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी भाषणे केली.

यात काही विद्यार्थ्यांनी इंग्रजीतून भाषणे केली हे विशेष. यानंतर प्रमुख वक्त्यांनी अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या जीवनावर प्रकाश टाकला व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप सोहनी सर यांनी केले. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तोष्णीवाल सर व तौर मॅडम यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक जाधव मॅडम यांनी करून आभार उबाळे सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## राष्ट्रीय चर्मकार महासंघ युवा संघटनेच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**माजलगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रीय चर्मकार महासंघ युवा संघटनेच्या वतीने लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे, जिल्हा परिषद सदस्य रामप्रभू साळुंखे, युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव, तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे, संभाजी ब्रिगेड तालुका अध्यक्ष तुकाराम नावडकर, जिल्हा सचिव राधाकिसन भाळशंकर, सचिन कांबळे, अँड. दत्ता जाधव, विजय नरहिरे, बालासाहेब गवळी,



राधे भैय्या कासार, शहराध्यक्ष प्रसाद वाघमोडे, संतोष जाधव, मयूर वाघमारे, संतोष खंडागळे, बंडू सोनवणे, भगवानराव सोनवणे, भीम राव गायकवाड, सहदेव खंडागळे, गुड्डु खंडागळे, वसंतराव वाघमारे, अशोक गवळी, अण्णा घोडके, आकाश कांबळे, दीपक सोनवणे, कृष्ण जाधव, प्रकाश सातपुते, गणेश कांबळे, मनोज वाघमारे, अनिल पवार व सर्व समाज बांधव उपस्थित होते.

## संस्कार मध्ये लोकमान्य टिळक पुण्यतिथी व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिली/दुसरी विभागांमध्ये लोकमान्य टिळक पुण्यतिथी व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर मुख्याध्यापिका श्रीमती शोभाताई कुलकर्णी आणि विभाग प्रमुख श्रीमती विद्याताई पारगांवकर व विशेष वक्त्या कुलकर्णी डी यू उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते माता सरस्वती ,लोकमान्य टिळक व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांनी या राष्ट्रीय नेत्यांबद्दल आपले मनोगत ,



गीते सादर केली . श्रीमती कुलकर्णी डी .यू. यांनी विविध उदाहरणाद्वारे लोकमान्य टिळक व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची विद्यार्थ्यांनाओळख करून दिली. त्यासोबतच दिनांक २३ /७/ २०२५ ते ०१/०८/२०२५ या कालावधीमध्ये 'टिळक चरित्र कथा सप्ताह ' हा हा आगळावेगळा उपक्रम संस्कार मध्ये घेण्यात आला. या उपक्रम ंतर्गत टिळकांच्या जीवनातील विविध घटना तसेच त्यांच्या जीवन चारित्रावर आधारित सर्व शिक्षक वृंदांनी विद्यार्थ्यांना कथा सांगितल्या.

## लिंबागणेश येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती उत्साहात साजरी

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी त्यांना विनम्र अभिवादन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते. प्रमुख उपस्थितीत माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख, बाळकृष्ण थोरात हे मान्यवर होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ



यांनी तर आभार प्रदर्शन औदुंबर थोरात यांनी केले. डॉ. गणेश ढवळे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर भाष्य करताना सांगितले की, लोकनाट्यांद्वारे समाजप्रबोधन करणारे अण्णाभाऊ साठे हे वंचितांच्या वेदना प्रभावीपणे मांडणारे थोर साहित्यिक होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांचे मोलाचे योगदान होते. कार्यक्रमास दामोदर थोरात,समीर शेख, सुरेश निर्मळ, बाळकृष्ण मुळे, विक्रांत वाणी, औदुंबर नाईकवाडे, अजय थोरात,दादा गायकवाड, अशोक जाधव ,जीवन मुळे, विठ्ठल कदम, तुकाराम गायकवाड आदी. ग्रामस्थ उपस्थित होते. अण्णाभाऊ साठे सार्वजनिक उत्सव समिती गठित करण्यात आली असून पदाधिकाऱ्यांची निवड खालीलप्रमाणे करण्यात आली: अध्यक्ष: बापू थोरात, उपाध्यक्ष: राजेंद्र थोरात, सचिव: अशोक थोरात, कोषाध्यक्ष: नितीन थोरात, सल्लागार: अनिल थोरात, सदस्य म्हणून औदुंबर थोरात, बालु थोरात, तुळशीराम पवार, संतोष थोरात, कृष्णा थोरात, गणेश थोरात, रमेश थोरात, बन्सी निर्मळ आदींची निवड झाली.ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच बालासाहेब जाधव यांच्या हस्ते नविन पदाधिकाऱ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

## आदर्श महाविद्यालयात टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

आदर्श शिक्षण संस्था बीड संचलित आदर्श महाविद्यालय पिंपळनेर गणपतीचे ता .जि. बीड येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी तसेच लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रहारचे संपादक



अशोक होळकर व बाभुळवाडीचे सामाजिक कार्यकर्ते अमोल सातपुते उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ बाळासाहेब भांडवलकर उपस्थित होते. मान्यवरांनी सर्वप्रथम लोकमान्य टिळक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून कार्यक्रमाचे प्रतिमा पूजन केले. यावेळी श्री अशोक होळकर यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे तसेच लोकमान्य टिळक यांच्या जीवन चरित्रावर मनोगत व्यक्त केले.

## राजर्षी शाहू कन्या विद्यालयात साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी



**बीड । प्रतिनिधी**

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ बीड द्वारा संचलित, राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय व राजमाता इंग्लिश स्कूल तेलगाव रोड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू कन्या विद्यालयाच्या प्रांगणामध्ये साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती. कृतिका एस.खांडरे ३ रे दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ९२७ / २०२५**

**नागुराव सितराम देवडकर वि. निरंक**

ज्यापेक्षा **मंडाबाई भ्र. सितराम देवडकर, ह्या दिनांक २९.०५.२०२४ रोजी नाथापुर, ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार-

१. नगुराव पि.सिताराम देवडकर, वय - ५१ वर्षे, रा. नाथापुर, ता. जि. बीड.

अर्जदार हा मयत नामे **मंडाबाई भ्र. सितराम देवडकर,** यांचा मुलगा आहे. अर्जदाराचे वडील व मयताचे पती सिताराम धोंडीबा देवडकर हे ब-याच वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया को हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच त्यांचा हक्क शाबीत दिसल्य स,त्यांना/अर्जदारांना पुरावा घेऊन, सदरहू मयत मंडाबाई भ्र. सितराम देवडकर, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख ०२/०८/२०२५ आहे.**

आज दिनांक ०२ जुलै माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**(अँड. वाय. आर. शेळके यांच्या मार्फत)**

**आदेशावरून.**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

**शिक्का**

**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड**

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी के. एस. पी. विद्यालयात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के. एस.पी विद्यालय येथे लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. मार्गदर्शक संस्थाध्यक्षा सौ. अंजलीताई शेळके यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पुजन



करण्यात आले. अण्णाभाऊ साठे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकींना अनुसरत दलित कार्याकडे वळले आणि दलित व कामगारांच्या जीवनातील अनुभवांना प्रकट करण्यासाठी त्यांच्या कथांचा वापर केला. अण्णाभाऊ साठेंच्या पोवाडा आणि लावणी यांसारख्या लोककथात्मक कथा शैलींच्या वापराने लोकांमध्ये ते लोकप्रिय बनले व त्यांचे कार्य अनेक समुदायांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केलेल्या 'फकिरामध्ये, अण्णाभाऊ साठेंनी आपल्या समुदायाला पूर्ण भुखमरीपासून वाचवण्यासाठी ग्रामीण रूढिवादी प्रणाली आणि ब्रिटिश शासनाच्या विरुद्ध विद्रोह करणाऱ्या नायक फकिराला चित्रित केले. अशा प्रकारे शाळेतील मुलांना अण्णाभाऊ साठे यांच्या बद्दल अवगत करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख श्री. ऋषिकेश शेळके, शाळेतील प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थित कार्यक्रम संपन्न झाला.


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● रविवार, दि. ०३ ऑगस्ट २०२५ ● पान ४

## थोडक्यात

### कवडगाव ते श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी दिंडी सोहळा




**कवडगाव । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील कवडगाव (बु)येथील समस्त भजनी मंडळ व गावकरी यांच्या वतीने गेल्या १४ वर्षापासून एकविसाव्या शतकातील महान विभूती ह भ प वैकुंठवासी किसन बाबा महाराज क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या पुण्यस्मरणानिमित्त पायी दिंडी सोहळा निघतो याही वर्षी हा पायी दिंडी सोहळा दिनांक ७/८/२५ गुरुवाररोजी ग्रामप्रदर्शना करून व बजरंग बली चे दर्शन घेऊन प्रस्थान करणार आहे या दिंडीचा पहिला मुक्काम ताडसोन्ना येथे तर दिंडी दुसऱ्या दिवशी श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे होईल. दिनांक ९/८/२५ गुरुवारी रोजी सकाळी ग्राम पंचायत प्रदक्षिणा करून दिंडी सभामंडपामध्ये काल्याचे कीर्तन श्रवण करून दिंडीचा समारोप होईल. दिंडी सोहळ्यामध्ये जास्तीत जास्त भाविक भक्तांनी सहभागी व्हावे असे समस्त भजनी मंडळ कवडगाव व गावकरी यांनी केले आहे.

### माळापुरी-कुर्ला-कुक्कडगाव रस्त्याच्या कामाला गती - लोक आंदोलनच्या पाठपुराव्याला यश

**बीड । प्रतिनिधी**

माळापुरी-कुर्ला-कुक्कडगाव या रस्त्याचे अर्धवट काम पूर्ण करण्यासाठी लोक आंदोलन न्यासाचे बीड जिल्हाध्यक्ष तुषार पाटील यांनी सातत्याने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या निवेदनाची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाने कंत्राटदारास तातडीने काम सुरू करून पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. या रस्त्याच्या अपूर्ण कामामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत होता. पंचक्रोशीतील नागरिकांची समस्या लक्षात घेऊन माळापुरी कुर्ला कुक्कडगाव रस्ता दर्जेदार व्हावा यासाठी अगोदरपासूनच लोक आंदोलन न्यासाचे जिल्हाध्यक्ष श्री. तुषार पाटील यांनी सतत प्रयत्न केले होते. नागरिकांच्या अडचणीची जाणीव ठेवून रस्ता दर्जेदार होण्यासाठी लोक आंदोलन न्यासाने सतत प्रयत्न करत अखेर रस्ता दर्जेदार आणि पूर्ण व्हावा यासाठी सतत प्रयत्न केले तसेच रस्त्याचे काम तात्काळ सुरू न केल्यास लोक आंदोलनाचा इशाराही दिला होता अखेर सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या आदेशांनुसार लवकरच रस्त्याचे काम पूर्ण होणार असून, या निर्णयामुळे परिसरातील लोकांना सुरक्षित व सोयीस्कर रस्ता उपलब्ध होणार आहे.

### आज वडवणीत संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

**रक्तदान शिबीरास उपस्थीत रहा: सकल मराठा समाज**



**वडवणी । प्रतिनिधी**

मराठा समाजाचे संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांचा वाढदिवस १ ऑगस्ट रोजी आहे. त्यानिमित्त रविवार दि ३ ऑगस्ट रोजी संभाजी राजे व्यापारी संकुलन डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व समाज बांधवांनी हजारोंच्या संख्येने महा रक्तदान शिबिरास उपस्थित राहण्याचे आवाहन सकल मराठा समाज वडवणी तालुक्याच्या वतीने करण्यात आले आहे. मराठा समाजाचा संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी माझा वाढदिवस कसल्याही प्रकारे अवाढव्य खर्च न करता सामाजिक उपक्रमाने साजरा करावा असे आवाहन केले होते.त्यांच्या हाकेला ओ देत सकल मराठा समाज वडवणी तालुक्याच्या वतीने वाढदिवसा निमित्त भव्य महा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.गेल्या वर्षी मोठ्या प्रमाणात तरुण युवकांसह सर्व समाज बांधवांनी उस्फूर्तपणे रक्तदान शिबिरात सहभाग घेऊन रक्तदान केले होते.गेल्या वर्षी पेक्षा यावर्षी मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.हे रक्तदान शिबिर संभाजी राजे व्यापारी संकुल डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक वडवणी या ठिकाणी होणार आहे. तरी या महा रक्तदान शिबिरामध्ये सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन सकल मराठा समाज वडवणी तालुक्याच्या वतीने करण्यात आले आहे.रक्तदानाच्या नोंदणीसाठी ९१५८३८६१६६ या मोबाईल नंबर वर गावाचे नाव आपले नाव व मोबाईल नंबर पाठवावा.

### मराठ्यांनी २९ ऑगस्टला मुंबईला यावा: किरण डावकर

**प्रत्येक गावामध्ये मुंबईला चला असे बॅनर लावा**



**बीड । प्रतिनिधी**

चंद्र सूर्य जोपर्यंत पृथ्वीतलावर आहेत तोपर्यंत आपल्या लेकराला हक्काची रोटी मिळवायची असेल तर येणाऱ्या २९ ऑगस्टला जास्तीत जास्त संख्येने मुंबई कडे मार्गस्थ होण्यासाठी तयारीला लागा. पिढ्यान पिढ्या नेत्यांच्या सतरंज्या उचलण्यासाठी रात्रंदिवस एक करणाऱ्या लोकांनी आपल्या मुलांच्या व आपल्या येणाऱ्या पिढीच्या भविष्यासाठी एक दिवस मुंबईला येण्यासाठी आपल्या सर्वांना ताकदिने सामील व्हायचं आहे. आपण आपल्या मित्रांना आणि आपल्या नातेवाईकांना निमंत्रण द्यायच आहे. मनोज दादा जरांगे पाटलांची तब्येत ठीक नसतानाही आपल्या सर्वांच्या भवितव्यासाठी आपल्या मराठा समाजासाठी स्वतःच्या घरावर तुळशीपत्र ठेवून हा योद्धा आपल्यासाठी झुंज देत आहे. त्यामुळे आपल्या सर्वांची उपस्थिती मनोज दादांनी केलेल्या संघर्षाची नोंद इतिहासात लिहिण्यात येईल आणि आपल्या सर्वांना हक्काच आरक्षण मिळून आपल्या सर्वांचे स्वप्न मनोज दादाच्या प्रयत्नाने पूर्ण होईल याचसाठी आपल्या सर्वांना येत्या २९ ऑगस्टला आपले सर्व कामधंदे , नोकरी, जॉब सर्व कामे जे काय असेल ते पाठीमागे सोडून आपल्या संघर्ष योद्धा मनोज दादाच्या पाठीमागे खंबीरपणे उभारण्याची गरज आहे संसार तर सर्वांनाच आहे परंतु आपल्या सर्वांच्या भवितव्यासाठी स्वतःच्या संसाराची राख ▶ उर्वरित पान २ वर

## शेतकऱ्यांनो, तुमच्या शेतीचं भविष्य तुमच्या हातात...

# ई पीक पाहणी ४.०.० ॲपमधून करा नोंदणी : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बीड । प्रतिनिधी**

आपल्या शेतातील पिकांची अचूक नोंद आता थेट मोबाईलमधून करता येते आणि हे शक्य होतं ई पीक पाहणी ४.०.० या नव्या ॲपमुळे . सरकारने आता या ॲपचं अपडेटेड व्हर्जन प्ले स्टोअरवर उपलब्ध केल आहे . खरीप हंगामातील पिकांची नोंदणी १ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर २०२५ दरम्यान केली जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या मोबाईलमधील ई पीक पाहणी ॲप अपडेट करून घेणं गरजेचं आहे, अस




आवाहन बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केल आहे.



बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी कळवले आहे की हे ॲप वापरायला सोपं असून, तुमच्या शेताचा गट क्रमांक , खाते क्रमांक आणि पिकांची माहिती भरून, शेतातील पिकांचे फोटो अपलोड करायचे असतात . नोंदणी पूर्ण झाल्यावर त्याची प्रत जतन करता येते. ही नोंद तुमच्यासाठी अनेक सरकारी योजनांचा दरवाजा उघडणारी चावी ठरते .

याविषयी अधिकची माहिती देताना निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी म्हटले की ई पीक पाहणीचं महत्त्व केवळ नोंदपुरतं मर्यादित नाही. पावसामुळे नुकसान झाल , तर भरपाई हवी असेल, बँकेकडून पीक कर्ज हवं असेल ; शासकीय योजना, अनुदान, ▶ उर्वरित पान २ वर

### माजलगाव सह दुय्यम निबंधक कार्यालयात महसूल दिन उत्साहात साजरा

**शेतकऱ्यांचा व नागरिकांचा सत्कार, महिलांना मुद्रांक शुल्क सवलतीचा लाभ**

**माजलगाव । प्रतिनिधी**

महसूल दिनानिमित्त दि.१ ऑगस्ट२०२५ शुक्रवार रोजी माजलगाव येथील सह दुय्यम निबंधक कार्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून उत्साहात साजरा करण्यात आला.या दिवशी दस्त नोंदणीसाठी आलेल्या नागरिकांचे पुष्पहार देऊन स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे सलोखा योजना अंतर्गत दस्त नोंदणी करणाऱ्या मौजे नाखलगाव येथील शेतकऱ्यांचा सन्मान.त्यांनी या योजनेंतर्गत लाभ घेतले असून त्यांचाही पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी निवासी सदनिका, फ्लॅट आणि बंगला खरेदीसाठी १ टक्के मुद्रांक शुल्क सवलतीच्या दरात दस्त नोंदणी करण्यात आली.या योजनेचा लाभ घेणाऱ्या ▶ उर्वरित पान २ वर

### दादा येणार... मेन रोड स्वच्छ, गल्ली बोळयाच काय ?- शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री अजित पवार बीड जिल्ह्या दौऱ्यावर येत असून मेन रोड स्वच्छ करण्यात येत आहे. पण बीड शहरातील गल्लीबोळाची घाण कधी काढणार हा नागरिकाला प्रश्न पडलेला आहे. काही भागात नाल्या वरून पाणी रोडवर येत



आहे. त्यामुळे दुर्गंधी पसरत आहे. त्याचबरोबर रोगराईचे प्रमाण वाढलेले आहे. दूषित पाण्यामुळे मच्छर आणि त्यामुळे होणारे आजाराला नागरिकाला सामोरे जावे लागत आहे. त्याला जिम्मेदार फक्त नगरपरिषद आहे. एकीकडे'स्वच्छ बीड ' सुंदर बीड ' मोहिमे अंतर्गत मुख्य कार्यकारी ▶ उर्वरित पान २ वर

### अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे समाजाला दिशा व चालना देणारे होते : विनायक रत्नपारखी

**माजलगाव । प्रतिनिधी**

संयुक्त महाराष्ट्र व कामगार चळवळीचा बुलंद आवाज, थोर विचारवंत, समाज सुधारक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या निमित्ताने माजलगाव येथे लहुजी विद्रोही सेनेचे संस्थापक अध्यक्ष भास्कर शिंदे यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात साहित्यरत्न



अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. या प्रसंगी भाजपा शहर मंडल अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी अण्णाभाऊ साठे यांचे कार्य सांगताना म्हणाले अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे होते. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात त्यांचे व त्यांच्या साहित्याचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते. संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे काम अण्णा भाऊ साठे यांनी केले.

▶ उर्वरित पान २ वर

### हाजी अरफात शेख यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या खाटीक समाज सेवा संस्थेच्या जिल्हास्तरीय मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित रहा : जावेद कुरेशी, मुश्ताक कुरेशी

**गेवराई । प्रतिनिधी**

राज्य मुस्लिम खाटीक समाज सेवा संस्थेचा भव्य जिल्हास्तरीय मेळावा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष हाजी अरफात शेख यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील हज हाऊसमध्ये सोमवार, दिनांक ४ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. तरी या मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राज्य मुस्लिम खाटीक समाज सेवा संस्थेचे राज्य उपाध्यक्ष जावेद भैय्या कुरेशी व बीड जिल्हा अध्यक्ष मुश्ताक कुरेशी यांनी केले आहे.

राज्य मुस्लिम खाटीक समाज सवा संमार्गदर्शनाखाली अध्यक्ष हाजी अरफात शेख यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन खात्याच्या कॅबिनेट मंत्री नामदार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, मंत्री नामदार संजय सिरसाट, माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार, माजी मंत्री अर्जुन खोतकर, माजी मंत्री धनंजय मुंडे, आमदार अतुल सावे, संजय केनेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यात अनेक महत्त्वाच्या विषयावर चर्चा केली जाणार असून सर्व उपस्थित मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तरी मुस्लिम खाटीक व कुरेशी समाजबांधवांनी या जिल्हास्तरीय मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राज्य खाटीक समाजसेवा संस्थेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष जावेद भैय्या कुरेशी, बीड जिल्हाध्यक्ष मुश्ताक कुरेशी, उमापूर येथील सामाजिक कार्यकर्ते जुबेर कुरेशी यांच्यासह संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी केले आहे.

### बीडच्या बाजार समितीत विक्रमी २४ टन रेशीम आवक; १ कोटी ३३ लाखांची खरेदी

**संचालक मंडळ, सभापती, उपसभापती, बाजार समिती प्रशासनाच्या मेहनतीमुळे हे शक्य झाले : संचालक धनंजय गुंदेकर**

**बीड । प्रतिनिधी**

येथील छत्रपती श्री शिवाजी महाराज कृषी उत्पन्न बाजार समिती बीड येथील लोकनेते स्व विनायकराव मेटे साहेब रेशीम कोष खरेदी केंद्रामध्ये गेल्या आठवडाभरात विक्रमी रेशीम कोष आवक झालेली आहे. ही आवक इतकी मोठी आहे की खरेदीची



रक्कम थेट कोट्यवधीचा आकडा पार करणारी ठरली आहे. दिनांक २८ जुलै ▶ उर्वरित पान २ वर

# जगण्यासाठी लढाई आणि मृत्यूनंतरही मरणयातना

**स्मशानभूमीअभावी उघड्यावर अंत्यसंस्कार ; मृतदेह शासकीय कार्यालयासमोर ठेवण्याच्या घटनांत वाढ**

**पालकमंत्री अजित पवार यांनी जिल्हा नियोजनातून निधी द्यावा : डॉ. गणेश ढवळे यांची मागणी**

**बीड । प्रतिनिधी**

आयुष्यभर संघर्ष केल्यानंतर निदान मृत्यूत तरी शांती लाभावी, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा असते. मात्र बीड जिल्ह्यातील १३९४ गावांपैकी तब्बल ६५६ गावांमध्ये अजूनही स्मशानभूमिच उपलब्ध नाही, अशी खंत सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केली. त्यामुळे मृतदेहाचे शेतात, नदीकाठी वा उघड्यावर अंत्यसंस्कार करण्याचे हाल सध्या अनेक गावांमध्ये घडत



आहेत. विशेषतः पावसाळ्यात ही स्थिती अधिकच बिकट होत असून पत्रे वा ताडपत्री टाकून मृतदेहावर अंत्यसंस्कार करावा लागतो, ही बाब प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर गंभीर प्रश्न उपस्थित करते.



अंबेजोगाई (२७ जुलै २०२५) – लिंगायत समाजाला स्मशानभूमीसाठी जागा न मिळाल्यामुळे नागरिकांनी मृतदेह नगरपालिकेसमोर ४ तास ठेवून आंदोलन केले.

सुशी वडगाव (२१ डिसेंबर २०२३) – स्मशानभूमी नसल्याने तुळशीराम कलेढोण (वय ५४) यांचा मृतदेह ग्रामपंचायत कार्यालयासमोर ठेवण्यात आला.

पालवण (१४ मे २०२४) – अंत्यसंस्कारास विरोध झाल्याने अट्रासिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल.

सोने सांगवी (सुर्डी) – चार महिन्यांत ३ वेळा मागासवर्गीय महिलांचे अंत्यसंस्कार रोखले गेले ▶ उर्वरित पान २ वर